N.C.R.B (एन.सी.आर.बी)

I.I.F.-I (एकीकृत अन्वेषण फॉर्म - १)

# FIRST INFORMATION REPORT

**(Under Section 154 Cr.P.C.)**

प्रथम खबर अहवाल

**(कलम १५४ फौजदारी प्रक्रिया संहिता)**

1. **District (जिल्हा):** नंदुरबार **P.S.(ठाणे):** सारंगखेडा

**FIR No.(प्रथम खबर क्र.):** 0066 **Year (वर्ष):** 2024

**Date and Time of FIR (प्र. ख. दिनांक आणि वेळ):** 16/03/2024 22:44

2.

| S.No. (अ.क्र.) | Acts (अधिनियम) | Sections (कलम) |
|---|---|---|
| 1 | भ्रष्टाचार प्रतिबंधक अधिनियम, १९८८ | 7 |

3. (a) **Occurrence of offence (गुन्ह्याची घटना):**

1. **Day(दिवस):** शनिवार **Date From (दिनांक पासून):** 16/03/2024

**Time Period (कालावधी):** पहर 5 **Date To ( दिनांक पर्यंत):** 16/03/2024

**Time From (वेळेपासून):** 13:37 बजे

**Time To (वेळेपर्यंत):** 14:01 बजे

(b) **Information received at P.S. (माहिती मिळालेले पोलीस ठाणे):**

**Date (दिनांक ):** 16/03/2024 **Time (वेळ):** 22:44 बजे

(c) **General Diary Reference (रोजनामचा संदर्भ ):**

**Entry No. (नोंद क्र.):** 015

**Date & Time (दिनांक आणि वेळ):** 16/03/2024 22:44 बजे

4. **Type of Information (माहितीचा प्रकार):** लेखी

5. **Place of Occurrence (घटनास्थळ):**

1.(a) **Direction and distance from P.S.(पोलीस ठाण्यापासून दिशा व अंतर):**

दक्षिण, 1[illegible] किमी **Beat No. (बिट क्र.):**

(b) **Address (पत्ता):** शेत शिवारात ,कानडी तश

(c) **In case, outside the limit of this Police Station, then (या पोलीस ठाण्याच्या हद्दीबाहेर असल्यास):**

**Name of P.S.(पोलीस ठाण्याचे नाव):**

**District(State) (जिल्हा(राज्य)):**

6. **Complainant / Informant (तक्रारदार/माहिती देणारा):**

(a) **Name (नाव):** प्रदिप एकनाथ पाटील

(b) **Father's/Husband's Name(वडील / पती चे नाव) :**

(c) **Date/Year of Birth (जन्म तारीख/वर्ष):** 1982

(d) **Nationality (राष्ट्रीयत्व):** भारत

(e) **UID No. (यु.आय.डी. क्र.):**

(f) **Passport No.(पारपत्र क्र.):**

**Date of Issue (दिल्याची तारीख):**

**Place of Issue (दिल्याचे ठिकाण):**

(g) **ID details (Ration Card,Voter ID Card,Passport,UID No.,Driving License, PAN)** ओळखपत्र विवरण (राशन कार्ड ,मतदाता कार्ड ,पासपोर्ट, यूआईडी सं., ड्राइविंग लाइसेंस, पॅन कार्ड )

| S.No. (अ.क्र.) | ID Type (ओळखपत्राचा प्रकार) | ID Number (ओळखपत्राचा क्रमांक) |
|---|---|---|
| 1 | | |

(h) **Address (पत्ता):**

| S.No. (अ.क्र.) | Address Type (पत्याचा प्रकार) | Address (पत्ता) |
|---|---|---|
| 1 | वर्तमान पता | कानडी त श,शहादा,नंदुरबार,महाराष्ट्र,भारत |
| 2 | स्थायी पता | कानडी त श,शहादा,नंदुरबार,महाराष्ट्र,भारत |

(i) **Occupation (व्यवसाय):**

(j) **Phone number (फोन नं.):**

**Mobile (मोबाइल नं.):**

7. **Details of known/suspected/unknown accused with full particulars** (माहीत असलेल्या /संशयीत/अनोळखी आरोपीचा संपूर्ण पत्ता):

| S.No. (अ.क्र.) | Name (नाव) | Alias (उर्फनाव) | Relative's Name (नातेवाईकाचे नाव) | Present Address (वर्तमान पता) |
|---|---|---|---|---|
| 1 | विनाद बाळु शिंदे | | | 1. सावखेडा पो कवळीथ,शहादा नंदुरबार,महाराष्ट्र,भारत |

8. **Reasons for delay in reporting by the complainant/informant (तक्रारदार/माहिती देणा-याकडून तक्रार करण्यातील विलंबाची कारणे):**

9. **Particulars of properties of interest (संबंधीत मालमत्तेचा तपशील):**

| S.No. (अ.क्र.) | Property Category (मालमत्ता वर्ग) | Property Type (मालमत्ता प्रकार) | Description (वर्णन) | Value(In Rs/-) (मुल्य (रु.) |
|---|---|---|---|---|
| 1 | इलेक्ट्रिकल आणि इलेक्ट्रॉनिक सामान | मोबाईल फोन | एक विवो कंपनीचा मोबाईल | 2,000.00 |
| 2 | सांस्कृतिक मालमत्ता | पोषाख | एक फिक्कट निळ्या रंगाचा फुल बाहीचा शर्ट त्यावर पांढरी चौकडी | 0.00 |

| S.No. (अ.क्र.) | Property Category (मालमत्ता वर्ग) | Property Type (मालमत्ता प्रकार) | Description (वर्णन) | Value(In Rs/-) (मुल्य (रु. |
|---|---|---|---|---|
| | | | डिजाईन असलेला( आलेसेचा) | |
| 3 | सांस्कृतिक मालमत्ता | पोषाख | एक निळ्या रंगाचा फुल बाहीचा राखाडी चौकडीची डिजाईन असलेला फिर्यादीयांचा | 0.00 |
| 4 | नाणे आणि चलन | भारतीय- रुपया | 500 रुपयाचे 06 चलनी नोटा | 3,000.00 |

10 **Total value of property (In Rs/-)**
**(चोरीस गेलेल्या मालमत्तेचे एकूण मुल्य (रू. मध्ये)):**

5,000.00

11.**Inquest Report / U.D. case No., if any**
**(इन्क्वेस्ट अहवाल/ अकस्मात मृत्यू प्रकरण क्र.,जर असल्यास)):**

| S.No. (अ.क्र.) | UIDB Number (यु.आय.डी.बी.क्र.) |
|---|---|

12.**First Information contents (प्रथम खबर हकीकत ):**

फिर्याद सारंगखेडा पोलीस स्टेशन,
जिल्हा- नंदुरबार
दिनांक 16/03/2024

माझे नाव प्रदिप एकनाथ पाटील, वय 42 वर्श, व्यवसाय -शेती, रा.वरूळ कानडी त.श. शहादा, ता.शहादा, जि.नंदुरबार, मो.क्र.9373547740

समक्ष हजर राहून फिर्याद देतो की, मी वरील ठिकाणी पत्नी दिपाली, तीन मुली, एक मुलगा अशांसह राहतो व शेती व्यवसाय करून कुटुंबाचा उदरनिर्वाह करतो.

आमची वडीलोपार्जित षेतजमीन मौजे कानडी खुर्द त.श. शिवारात गट नं.54 मध्ये दिड एकर शेती वडील श्री. एकनाथ पाटील यांचे नावे आहे तसेच आमचे शेतीच्या बाजुला गट नं.54/1 क्षेत्र दिड एकर हे माझे काका राजाराम इंदास पाटील यांचे नावे आहे. आम्ही व आमचे काका यांचेत शेतीचे क्षेत्रावरून मतभेद असल्याने सन 2023 मध्ये क्षेत्र मोजणीसाठी वडील श्री.एकनाथ पाटील याचे नावे भुमी अभिलेख कार्यालय, शहादा येथे अर्ज केला होता. तसेच सदर अर्जाचे अनुषंगाने मीच वेळोवेळी भुमी अभिलेख कार्यालयात येऊन आमचे कामाचा पाठपुरावा केलेला आहे. सदर अर्जावरुन भुमी अभिलेख कार्यालयामार्फत दिनांक 04/10/2023 रोजी आमचे शेतीची शासकिय मोजणी करून त्याचा नकाशा मिळालेला आहे. त्यावेळी आम्ही 4,500/- रुपये फि भरलेली आहे व त्याबाबत मला चलनदेखील मिळालेले आहे. त्यावेळी सदर शेताची मोजणी भुमी अभिलेख कार्यालयातील श्री. सुर्यवंशी यांनी केली होती.

सदर शेताची मोजणी झाल्यानंतर देखील माझे काका श्री.राजाराम इंदास पाटील यांनी "तीन गुंठे कमी निघत आहे, सरकारी मोजणी करणाऱ्या माणसाला परत शेतात आणुन खुणा करुन दया." असे वारंवार सांगत आहेत. म्हणुन जानेवारी 2024 मध्ये मी व लहान भाऊ शरद असे फेरमोजणीच्या अर्जासह भुमी अभिलेख कार्यालय, शहादा येथे गेलो होतो. यावेळी मी भुमी अभिलेख कार्यालय, शहादा या कार्यालयात फेरमोजणी संबंधाने कोणाकडे अर्ज करावा लागेल अथवा कोणाला भेटु ? असे विचारल्यानंतर भुमी अभिलेख कार्यालय, शहादा येथे उपस्थित असलेले श्री. विनोद शिंदे हे माझ्याकडे आले व मला म्हणाले की, "तुम्हाला अर्ज करण्याची आवश्यकता नाही. तुम्ही मला 3,000/- रुपये द्या. मी तुमचे शेतात येऊन फेरमोजणी करुन खुणा करुन देतो,"असे सांगितले. भूमी अभिलेख कार्यालय येथील लोकसेवक शिपाई श्री.शिंदे मागत असलेले 3,000/-रूपये ही कोणतीही शासकीय फी नसुन ती लाचच आहे अशी माझी खात्री झालेली आहे.

मला त्यांना लाच देण्याची मुळीच इच्छा नसल्याने त्यांचेवर कारवाई होणेकामी मी दिनांक 12/03/2024 रोजी माझे ओळखीचे पोलीस श्री.विलास पाटील दादा यांना भेटुन व वरीष्ठ अधिकारी श्री.चौधरी साहेब यांचेशी फोनवर बोलुन माझे तक्रारीची हकिकत सांगितली व माझे तक्रारीचे अनुशंगाने कार्यवाही करणेकामी शहादा येथे येणेबाबत विनंती केली.

माझेत व लोकसेवक शिपाई श्री.शिंदे यांचेत कोणतेही आर्थिक अगर उधार-उसणवारीचा व्यवहार अथवा वाद-विवाद अथवा पूर्वीमनस्य नाही. तरी दिनांक 13/03/2024 रोजी शिपाई श्री.शिंदे यांनी मला भेटणेसाठी भुमी अभिलेख कार्यालय येथे बोलाविलेले असुन भुमी अभिलेख कार्यालयातील शिपाई श्री. शिंदे हे मला आधीच सांगितल्याप्रमाणे माझेकडुन पुन्हा 3,000/-रूपये लाचेची मागणी करण्याची दाट शक्यता आहे. तरी त्यांचेवर योग्य ती कारवाई होणेबाबत मी दिनांक 13/03/2024 रोजी अॅन्टी करप्शन ब्युरो कार्यालय, नंदुरबार येथे लेखी तक्रार पंच क्र.01 श्री.विजय ओजन्या पावरा व पंच क्र. 02 श्री. मनियार अब्दुल जव्वाद मोहम्मद रजा यांचेसमोर शहादा येथील नवीन बस स्थानक येथे सरकारी वाहनात दिलेली आहे, लेखी तक्रार दिल्यानंतर पोनि/वाघ मॅडम यांनी सदरची तक्रार दोन्ही पंचांना वाचावयास दिली. त्यानतंर दोन्ही पंच व श्रीमती वाघ मॅडम अशांनी सहया केल्या.

त्यानंतर पोनि वाघ मॅडम यांनी मला व दोन्ही पंचांना लाचलुचपत प्रतिबंधक विभागाचे कार्यप्रणालीची माहिती देवून डिजीटल व्हॉईस रेकॉर्डरची सविस्तर माहिती दिल्यानंतर मला पंच नं.1 श्री. पावरा यांचेसह पाठवुन भूमि अभिलेख कार्यालय येथील शिपाई श्री.शिंदे यांची भेट घेवुन त्यांची पंचासमक्ष लाच मागणीची पडताळणी करण्यात येणार असल्याचे सांगीतले. पडताळणी पंचनाम्यात उल्लेख केल्याप्रमाणे मला, पंच नं. 1 श्री.पावरा, पंच नं.2 श्री. मनियार व स्टाफ अशांना महत्त्वाच्या सुचना दिल्या. तसेच शिपाई श्री.शिंदे यांनी पंच नं.1 श्री.पावरा यांचेविषयी चौकशी केली तर त्यांची मित्र म्हणुन ओळख करून देण्याचे सांगितले.

त्यानंतर पोनि वाघ मॅडम यांनी सांगितलेप्रमाणे व्हॉईस रेकॉर्डरमध्ये नवीन मेमरीकार्ड टाकुन पोना/सुभाष पावरा यांनी माझे टी-शर्टचे आतील बनियानला दोरीने लावून व्हॉईस रेकॉर्डर सुरू करून दिले ती वेळ 14.19 वाजेची होती, त्यानंतर पंच क्र.01 श्री. पावरा व मला अषांना शिपाई श्री.शिंदे यांना भेटणेसाठी भूमी अभिलेख कार्यालय, शहादा येथे रवाना केले. त्याप्रमाणे मी माझ्या खाजगी मोटारसायकलवर बसुन पंच नं. 1 श्री.पावरा यांचेसह भूमि अभिलेख कार्यालय, शहादा येथे गेलो असता तेथे मी शिपाई श्री.शिंदे यांना भेटलो, तेव्हा पंच नंबर 01 श्री.पावरा हे माझेसोबत होते. त्यानंतर मी शिपाई श्री.शिंदे यांना नमस्कार केला व माझे कामाचे संबंधाने बोलणी केली असता चर्चेदरम्यान शिपाई श्री.शिंदे यांनी हाताचे इशाऱ्याने 03 बोटे दाखविली, त्याबाबत मी 'हं...म्हणजे?' असे बोलून न समजल्यासारखे केल्याने लोकसेवक श्री.शिंदे यांनी तीन हजार लागतील असे सांगितले. त्यावेळी मी शिंदे यांना या पैशांची काही पावती भेटेल का? बाबत विचारपूस केली असता, लोकसेवक श्री.शिंदे यांनी नकारार्थी मान हलवून तुम्हाला मग पुन्हा साडेचार हजार रुपये फी भरावी लागेल, त्याचे चलन लावुन परत तीच प्रोसिजर नविन करावी लागेल. असे सांगुन पहिले मागितलेच नही नां.......ती फी तुम्हाला लागेलच तीन हजार असे सांगून सदर पैसे मोजणीचे दिवषीच म्हणजे शनिवारीच देण्यास सांगितले. तरी शिपाई श्री. शिंदे यांनी तक्रारदार श्री.पाटील यांचेकडून त्यांचे शेतजमिनीची फेरमोजणी करण्याचे मोबदल्यात 3,000/- रु लाचेची मागणी केलेली आहे. शिपाई श्री.शिंदे यांनी केलेली पैशाची मागणी हि पंच नं. 1 श्री.पावरा यांचेसमक्ष करण्यात आलेली असून त्यांनी हाताने 03 बोटे दाखविले हे देखील पंचांनी समक्ष पाहीले आहे, तसेच माझे व शिपाई शिंदे यांचेतील बोलणे हे व्हॉईस रेकॉर्डरमध्ये रेकॉर्ड झाले असुन ते आपण व दोन्ही पंचांनी ऐकुन खात्री केली. त्यानंतर व्हॉईस रेकॉर्डरमधील रेकॉर्ड झालेले मेमरी कार्ड आपण ताब्यात घेतले.

त्यानंतर शिपाई श्री. विनोद शिंदे यांनी शनिवारी म्हणजे दिनांक 16/03/2024 रोजी पैसे देणेबाबत सांगितल्याने दिनांक 16/03/2024 रोजी सापळा कारवाई करण्याचे सर्वानुमते ठरविण्यात आले. त्यामुळे आपण आपलेकडील शासकिय वाहनाने पंच व स्टाफसह अॅन्टी करप्शन ब्युरो, नंदुरबार येथे परत गेले.

त्यानंतर पुर्वनियोजनाप्रमाणे दिनांक 16/03/2024 रोजी आपण दोन्ही पंच व स्टाफ असे खाजगी वाहनाने सकाळी 11.25 वा कानडी त.श. येथे आमचे शेतशिवाराजवळील श्री.छोटू डाया पाटील यांचे शेतात कोणासही दिसणार नाही अशा ठिकाणी येऊन थांबले होते. सदर ठिकाणी आपण मी, दोन्ही पंच व आपले स्टाफ अशांना सापळा कारवाईच्या वेळी घ्यावयाच्या दक्षतेबाबत सविस्तर सुचना दिल्या. त्यानंतर पोनि/वाघ मॅडम यांनी पंचासमक्ष माझेकडे शिपाई श्री.शिंदे यांना देण्याकरीता लाचेची मागणी केलेले पैसे 3,000/- रूपये हजर करण्यास सांगितले असता, मी माझे शेती उत्पन्नाच्या बचतीतून आणलेले 3,000/- रूपये आपल्यासमोर हजर केले. त्यात 500/-रु. दराच्या सहा चलनी नोटा होत्या. त्यांचे क्रमांक नोंदविण्यात आले. त्यानंतर आपले सुचनेवरुन पोना/पावरा यांनी सदर नोटांना अॅन्थ्रासिन पावडर लावण्यात येणार असल्याचे सांगुन त्याचे गुणधर्म व प्रात्यक्षिक करून दाखविले. तदनंतर आपले सुचनेवरुन पोना/सुभाष पावरा यांनी पंचासमक्ष लाचेच्या नोटांना अॅन्थ्रासिन पावडर लावून सदर रक्कम माझे शर्टचे उजवे खिशात ठेवली. त्यानंतर मला पॅन्टचे खिशातून हातरुमाल काढून झटकण्याचा लाच स्विकारल्याचा सापळा पथकास इशारा करणेबाबत व सदर इशारा मिळताच लाच रक्कम स्विकारणाऱ्यास सापळा पथक रंगेहात पकडतील असे सांगण्यात आले.

त्यानंतर आपण मला, पंच नं. 1 श्री.पावरा, पंच नं. 2 श्री. मनियार तसेच सर्व पोलीस स्टाफ अशांना पुन्हा

सापळा कार्यवाहीबाबत महत्त्वाच्या सुचना दिल्या. त्यानंतर आपले सुचनेवरुन पोहवा/ठाकरे यांनी व्हॉईस रेकॉर्डमध्ये नवीन मेमरीकार्ड टाकुन व्हॉईस रेकॉर्डर सुरू करून माझे शर्टाचे आतून दोरीने बनियनला लावुन दिले, त्यानंतर पंच न.1 श्री.पावरा व मला लोकसेवक शिपाई शिंदे हे आमचे षेतषिवारात आल्यावर त्यांची भेट घेणेबाबत सांगितले. त्याचप्रमाणे आपण, पंच न. 2 श्री.मनियार व सापळा पथक अंमलदार असे आमचे आजूबाजूचे शेतशिवारात येऊन आपले अस्तित्व लक्षात येणार नाही असे थांबले. काही वेळानंतर लोकसेवक श्री.शिंदे हे आमचे शेतात आले तेथे माझा भाऊ शरद, काका श्री. राजू इंदास पाटील व श्री.ललीत रामसिंग गिरासे तसेच मी व पंच नं.01 श्री. पावरा यांचेसह शिपाई शिंदे यांची भेट घेतली व कामाचे संबधांने चर्चा केली. तसेच चर्चेदरम्यान शिपाई श्री.शिंदे यांनी आमचे शेताची षेतमोजणी करुन दिली. षेतमोजणी झाल्यावर शिपाई श्री.शिंदे यांनी माझेकडे पाहून हाताचे इषाÚयाने पैसे मागणीचा इषारा केला असता मी माझे शर्टाचे डावे बाजुला असलेल्या खिषातून उजव्या हाताने पैसे काढून त्यांना 3,000/- रुपये दिले असता शिपाई श्री.शिंदे यांनी लाचेची 3000/-रू.रोख रक्कम ही त्यांचे उजव्या हाताने स्वीकारून त्यांचे शर्टचे डावे खिषात ठेवली. त्यानंतर लाच स्विकारलेबाबत मला यापूर्वी ठरवून दिलेला माझे पॅन्टचे खिषातून रुमाल काढुन झटकण्याचा इषारा केला असता श्रीमती वाघ मॅडम, पंच नं.2 श्री. मनियार व त्यांचे सापळा पथकाने शिपाई श्री.शिंदे यांना पंच साक्षीदारांसमक्ष पकडण्यात आले व अटकावून ठेवले. त्यादरम्यान पोहवा/ठाकरे यांनी आपले सुचनेवरुन माझे शर्टाचे आतील बनियानला बांधण्यात आलेले डिजीटल व्हॉईस रेकॉर्डर बंद करून आपल्या ताब्यात ठेवले. ती वेळ दुपारी 14.01 वाजेची होती. त्यानंतर आपण लोकसेवक शिपाई श्री.शिंदे यांना स्वतःची ओळख देऊन त्यांचे नाव, गाव विचारले असता त्यांनी त्यांचे नाव श्री. विनोद बाळू शिंदे, वय 42 वर्श, व्यवसाय- नोकरी, शिपाई, वर्ग 4, उपअधीक्षक भुमी अभिलेख कार्यालय, शहादा रा. सावखेडा, पो.कवळीथ, ता. शहादा, जि. नंदुरबार असे सांगितले.

त्यानंतर आपण शिपाई श्री. विनोद शिंदे यांना माझेकडुन लाचेची रक्कम घेतल्यावर पंच साक्षीदारासमक्ष रंगेहाथ पकडल्यानंतर खाजगी वाहनाने शहादा पोलीस स्टेशन येथे पुढील कार्यवाहीकामी आणले. त्याठिकाणी पोनि/वाघ मॅडम व त्यांचे पथकाने इतर कार्यवाही केली.

तरी दिनांक 1[illegible]/03/2024 रोजी भुमी अभिलेख कार्यालय, शहादा येथे श्री. विनोद बाळू शिंदे, वय 42 वर्श, व्यवसाय- नोकरी, शिपाई, वर्ग 4, उपअधीक्षक भुमी अभिलेख कार्यालय, शहादा रा. सावखेडा, पो.कवळीथ, ता. शहादा, जि. नंदुरबार यांनी माझे शेतजमीनीचे फेरमोजणी करुन देण्याचे मोबल्यात 3,000/- रुपये लाचेची मागणी केली. मागणी केलेली लाचेची रक्कम 3,000/- रु.दिनांक 16/03/2024 रोजी माझे कानडी तर्फे शहादा, ता. शहादा येथील गट नंबर 54 येथील शेतषिवारात पंचांसमक्ष स्विकारली, म्हणून त्यांना पंचसाक्षीदारांसमक्ष पकडण्यात आलेले असून माझी श्री. विनोद बाळू शिंदे, वय 42 वर्श, व्यवसाय- नोकरी,शिपाई, वर्ग 4, उपअधीक्षक भुमी अभिलेख कार्यालय, शहादा रा. सावखेडा, पो.कवळीथ, ता.शहादा, जि. नंदुरबार यांचेविरूध्द कायदेशीर फिर्याद आहे.

13. **Action taken: Since the above information reveals commission of offence(s) u/s as mentioned at Item No. 2.** (केलेली कारवाईः बाब क्र.२ मध्ये नमूद केलेल्या कलमान्वये वरील अहवालावरून अपराध घडल्याचे.)

(1) **Registered the case and took up the investigation:** (प्रकरण नोंदविले आणि तपासाचे काम हाती घेतले):

Laxman Baddu Chavan(I (Inspector)) / **or** (किंवा)

(2) **Directed (Name of I.O.)** (तपास अधिका-याचे नाव):

**Rank** (पद): **No.**(क्र.):

**to take up the Investigation** (ला तपास करण्याचे अधिकार दिले) **or** (किंवा)

(3) **Refused investigation due to** (ज्या कारणामुळे तपास करण्यास नकार दिला):

**or** (ज्या कारणामुळे तपास करण्यास नकार दिला)

(4) **Transferred to P.S.**
(गुन्हा दुसरी कडे पाठविला असल्यास त्या पोलीस ठाण्याचे नाव):

**District** (जिल्हा):

**on point of jurisdiction** (को क्षेत्राधिकार के कारण हस्तांतरित) .

**F.I.R. read over to the complainant / informant,admitted to be correctly recorded and a copy given to the complainant / informant free of cost.** (प्रथम खबर तक्रारदाराला/खबरीला वाचून दाखविली, बरोबर नोंदविली असल्याचे त्याने मान्य केले आणि तक्रारदाराला/खबरीला खबरीची प्रत मोफत दिली.)

R.O.A.C.(आर. ओ .ए .सी.)

14 **Signature/Thumb impression of the complainant / informant.**
(तक्रारदाराची/खबर देणा-याची सही/अंगठा):

15.**Date and time of dispatch to the court**
(न्यायालयात पाठवल्याची तारीख व वेळ):

पोलीस ठाणे अमलदार
सांगाखेडा पोलीस ठाणे

**Signature of Officer in charge, Police Station**
(ठाणे प्रभारी अधिका-याची स्वाक्षरी)

**Name** (नाव): Laxman Baddu C
**Rank**(पद): I (Inspector)
**No.**(सं.):